# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०- २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०-२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ-मेल: dyracademic@unipune.ac.in

संदर्भ : CC/309

दिनांक : 13/02/2017

मा.अध्यक्ष / सचिव
सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था
पुणे, अहमदनगर व नाशिक.

विषय : निवड समिती अहवाल, शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव व इतर पत्रव्यवहार शिक्षक मान्यता मिळालेल्या प्राचार्यांच्याच सहीने पाठविण्याबाबत....

महोदय,

महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २ (३४) मध्ये 'शिक्षक' या पदाची व्याख्या नमूद केलेली आहे व शिक्षक मान्यता कोण देते याचाही उल्लेख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिनियम क्र. ४१५ (२) (ई) मध्ये आहे.

महाविद्यालये/संस्थांमध्ये शिक्षकी पदांसाठी उमेदवारांची कायमस्वरूपी, एका शैक्षणिक वर्षासाठीचे शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव व त्यांचे निवड समिती अहवाल तसेच तासिका तत्वावरील (CHB) नेमणूक प्रस्ताव या विभागात सादर केले जातात. सदर प्रस्तावांची तपासणी केली असता या विभागास असे निदर्शनास आले आहे की, काही संलग्न महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था यांमधून सादर होत असलेल्या कागदपत्रांवर प्राचार्य/संचालक म्हणून सही करणा-या व्यक्तींना विद्यापीठाची शिक्षक मान्यता नाही अथवा प्राचार्य/संचालक पदाचा अधिकचा कार्यभार देण्यास विद्यापीठाची मान्यताही देण्यात आलेली नाही व अशा व्यक्तींच्या स्वाक्षरीने निवड समिती अहवाल, शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव व इतर पत्रव्यवहार सादर केल्याचे आढळून आलेले आहे. सदर बाब ही गंभीर आहे.

आपणास कळविण्यात येते की, शिक्षकांना व प्राचार्यांना मान्यता असणे हे महत्वाचे असल्याने यापुढे या विभागाने कायमस्वरूपी मान्यता दिलेल्या प्राचार्य/संचालकांच्याच स्वाक्षरीने किंवा प्राचार्य/संचालक या पदाचा अतिरिक्त कार्यभार दिलेल्या शिक्षकांच्या स्वाक्षरीने निवड समिती अहवाल,

शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव व इतर पत्रव्यवहार या विभागात सादर करावा. मान्यता नसलेल्या प्राचार्य/संचालकांच्या स्वाक्षरीने निवड समिती अहवाल, शिक्षक मान्यतेचे प्रस्ताव व इतर पत्रव्यवहार प्राप्त झाल्यास त्याबाबत पुढील कोणतीही कार्यवाही केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला,

संचालक
(म.वि.वि.मं.)